# सोलापूर जिल्हयातील वाळू गटांचे पर्यावरण अनुमतीसाठी मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार नेमणूक करणेकरिता प्रथम फेर ई-निविदा

जिल्हाधिकारी कार्यालय,सोलापूर
क्र.मशा/कार्या-1/गौख/आरआर-749
दि.07.03.2020

गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडून सर्व मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) यांना कळविण्यात येते की, सोलापूर जिल्ह्यातील सन 2020-21 व सन 2021-22 वर्षाकरिता वाळूगटांना पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेणेकरिता प्रत्येक वाळूस्थळांचे Form 1/1M, EIA, EMP, Mining Plan, Public Hearing व यासंबधी इतर अनुषंगीक बाबींची पुर्तता करणे तसेच District Survey Report तयार करुन केंद्र/राज्यपर्यावरण विभागाला सादर करुन मान्यता घेणेबाबतच्या कामाकरीता प्रथम फेर ई-निविदा मागविण्यात येत आहे.

सदर निविदेची सर्व अटी व शर्ती www.solapur.nic.in, https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. ई-निविदा वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी व स्विकृती | दि. 07 / 03 /2020 | दुपारी 2.00 पासुन |
| ई-निविदा स्विकृती अंतिम दिनांक | दि. 22 / 03 /2020 | दुपारी वेळ :- 05.00 |
| ई-निविदा उघडणे | दि. 23 / 03 /2020 | दुपारी वेळ :- 05.00 |

**अटी व शर्ती**:-

1. ई-निविदा अर्ज शुल्क रु.2000/- ऑनलाईन पध्दतीने भरणा करावे लागेल.
2. ई-निविदा इसारा रक्कम रु.10,000/- ऑनलाईन पध्दतीने भरणा करावा लागेल. तसेच अयशस्वी निविदाधारकाची इसारा रक्कम निविदा प्रक्रिया अंतिम झाल्यावर बिनव्याजी परत करण्यात येईल.
3. ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल अशा निविदाधारकास सुरक्षा रक्कम रु.1,00,000/- अनामत रक्कम म्हणुन ठेवावे लागेल. सुरक्षा अनामत रक्कम हे धनाकर्ष (DD) स्वरुपात सात दिवसाच्या आत जमा करावे लागेल. सदर अनामत रक्कम यशस्वीरित्या पर्यावरण अनुमती प्राप्त झालेल्या वाळू गटाच्या कालावधी पूर्ण होईपर्यंत जमा राहील.
4. पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) mining of minerals या विभागात Quality Council of India (QCI) किंवा National Accreditation Board for Education and Training याद्वारे मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे.
5. वाळूगटांच्या पर्यावरण अनुमती मिळवण्यासाठी Form1M, EIA, EMP, Mining Plan व District Survey Report तयार करण्याचा कमीत कमी 2 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
6. महसूल व वन विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्र.गौखनि-10/0219/प्र.क्र.9/ख, दि.03.09.19. केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि.14 सप्टेंबर 2016 (EIA Notification) दि.15.01.2016 व दि.03.03.2016 च्या व तसेच Sustainable Sand Mining Guidelines 2016 व Sand Mining Framework 2018 च्या तरतुदी लागू राहतील.

7. सदर निविदा सोलापूर जिल्हयातील सन 2020-21 व सन 2021-22 या वर्षाकरिता शासन नियमाप्रमाणे निश्चित केलेल्या वाळू गटाकरिता असेल. वाळू गटांची संख्या सुधारीत वाळू/रेती धोरण 2019 प्रमाणे गृहीत धरणेत येईल.
8. एका वाळूगटाकरिता सर्वात कमी किंमत ई-निविदा मध्ये प्राप्त होईल ती निविदा अट क्र.4, 5 व 6 च्या अधीन राहुन मान्य करण्यात येईल.
9. निविदा मान्य झाल्यावर कोणतेही अग्रीम रक्कम अनुज्ञेय राहणार नाही. पर्यावरण अनुमतीची अंतिम कार्यवाही झाल्यावर देयके अदा करणेत येईल.
10. वाळू/रेती निर्गती सुधारीत धोरण दि.03.09.19 नुसार पर्यावरण विषयक अनुमती व त्यानुंषगीक अन्य कामे करणे बंधनकारक राहील.
11. पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेणे, Form1M, EIA, EMP, Mining Plan याकामी आवश्यक असलेल्या सर्व कार्यपध्दतीचा अवलंब करुन व District Survey Report केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि.15.01.2016 व दि.14 सप्टेंबर 2006 (EIA Notification) च्या तरतुदीनुसार सुधारीत वाळू/रेती धोरण 2019 व शासन नियमाप्रमाणे रेती गट निश्चित केल्यावर 30 दिवसात पूर्ण करणे बंधनकारक राहील.
12. ज्या वाळूगटास केंद्र/राज्यस्तरीय पर्यावरण समितीची मान्यता/पर्यावरण अनुमती मिळेल फक्त त्याच वाळूगटाची रक्कम अनुज्ञेय राहील.
13. यशस्वी वाळू लिलावधारकांच्या नावे पर्यावरण अनुमती वर्ग करुन देणे, खाणकाम आराखडा व इतर आवश्यक कागदपत्रे संबंधित लिलावधारकाच्या नावे हस्तांतरण करणे आवश्यक राहील.
14. केंद्र/राज्यस्तरीय पर्यावरण बैठकीस mining of minerals प्रवर्गातील in-house expert हजर राहणे आवश्यक राहील. व प्रतिनिधी पाठविण्यात येऊ नये व याबाबत कुठलाही वाहन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
15. पर्यावरण सल्लागार जिल्हा वाळू सनियंत्रण समितीच्या बैठकीस व वाळूगटाचे स्थळ निरीक्षण करणाऱ्या तांत्रिक उपसमितीसोबत उपस्थित राहणे अनिवार्य राहील. व याबाबत कुठलाही वाहन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
16. जिल्हयातील नद्यांचा वाळू पुर्नभरण दर किती असेल याबाबत अभिप्राय व वाळूगटात उपलब्ध वाळूसाठा याबाबत माहिती देणे अनिवार्य राहील. तसेच तालुकास्तरीय समिती व तांत्रिक उपसमितीचा वाळू गट निश्चित करताना आवश्यक ते तांत्रिक सहकार्य करणे बंधनकारक राहील.
17. District Survey Report पर्यावरण समितीने व शासनाने निर्देश दिल्याप्रमाणे वेळोवेळी सुधारीत करावा लागेल.
18. Sustainable Sand Mining Guidelines 2016 व Sand Mining Framework 2018 व केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि.15.01.2016 व दि.25.07.2018 मधील तरतुदीनुसार District Survey Report तयार करणे बंधनकारक राहील. दि.25.07.2018 च्या तरतुदीनुसार वाळू व इतर गौणखनिजाचे District Survey Report तयार करणे बंधनकारक राहील.
19. निविदा मान्य झाल्यावर रु.100/- च्या मुद्रांकनावर करारनामा करावा लागेल.
20. सर्व अटी व शर्तीचे अनुपालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अवाश्यकतेप्रमाणे इतर दंडात्मक रक्कम देयकातुन कपात करणेत येईल.
21. देय असलेल्या रक्कमेतुन नियमानुसार 2% आयकर (TDS) कपात करणेत येईल.
22. सर्व अटी व शर्तीचे अनुपालन न केल्यास कुठलीही पुर्वसूचना न देता कोणत्याही वेळी करार रद्य करण्याचा अधिकारी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना राहतील.

23. सदर प्रकरणी काही वाद उदभवल्यास सोलापूर न्यायपालिकेच्या अधिकार क्षेत्रात सोडवण्यात येतील.

24. प्रशासकीय कारणास्तव निविदा नाकारण्याचा किंवा रद्य करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी सोलापूर यांना राहतील.

25. केंद्र शासन, राज्य शासन, मा.न्यायालय, मा.राष्ट्रीय हरित लवाद, हे पर्यावरण विषयक व खाणकाम विषयक वेळोवेळी जे आदेश देतील ते निविदाधारकास लागू राहतील.

26. न्यायालयीन प्रकरणांत तांत्रिक सल्ला देणे व मार्गदर्शन करणे बंधनकारक राहतील.

27. दर नमुद करताना जी.एस.टी व इतर सर्व कर विचारात घेऊन सर्व करांसह दर नमुद करावे.

28. महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग पत्र क्र.संकीर्ण-2019/प्र.क्र.01/ता.क.3 दि.03.12.19 नुसार वाळूगटाच्या प्रकल्पास पर्यावरण अनुमती मिळण्याकरिता जनसुनावणी घेणेबाबतची कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

29. जिल्हयातील गौणखनिज (वाळूगट) प्रकल्पास पर्यावरण अनुमती देण्याबाबत प्रस्ताव केंद्र/राज्यस्तरीय आघात मुल्यांकन प्राधिककरणाकडे/समितीकडे सादर करताना मा.सर्वोच्च न्यायालयाने, दीपक कुमार वि. हरियाणा राज्य व ई. (2012) 4 एसएससी 629 व मा.राष्ट्रीय हरित लवाद दि.13.09.18 रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

30. BOQ मध्ये दिलेल्या दरांचे करारनामा करतेवेळी दर देणे बंधनकारक राहील.

31. BOQ मध्ये नमुदा दराव्यतिरिक्त अन्य कोणतेही शुल्क अदा केले जाणार नाही.

32. निविदेमध्ये सहभागी होण्यास आवश्यक कागदपत्रे.

**(अ) तांत्रिक लिफाफा.**

I) अट क्र.4 नुसार मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार असल्याचे प्रमाणपत्र.

II) पॅन कार्ड

III) जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्र

IV) संबंधित कामाचा 2 वर्ष कामाचे अनुभव असल्याचे प्रमाणपत्र

V) मागील वर्षाचा आयकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र

VI) सदर निविदेमधील अटी व शर्ती मान्य असलेचे हमीपत्र.

VII ) निविदा अर्ज शुल्क व अनामत रक्कम भरलेली पावती.

**(ब) आर्थिक लिफाफा.**

I) सदर दर BOQ मध्ये सादर करावेत.

**सही/*****

**(संजीव जाधव)**

**अपर जिल्हाधिकारी, सोलापूर.**

**<u>प्रथम फेर ई-निविदा</u>**

जा.क्र.2020/मशा/कार्या-1/गौख/आरआर-749/20

गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडून सर्व मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) यांना कळविण्यात येते की, सोलापूर जिल्ह्यातील सन 2020-21 व सन 2021-22 वर्षाकरिता वाळूगटांना पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेणेकरिता प्रत्येक वाळूस्थळांचे Form 1/1M, EIA, EMP, Mining Plan, Public Hearing व यासंबधी इतर अनुषंगीक बाबींची पुर्तता करणे तसेच District Survey Report तयार करुन केंद्र/राज्यपर्यावरण विभागाला सादर करुन मान्यता घेणेबाबतच्या कामाकरीता प्रथम फेर ई-निविदा मागविण्यात येत आहे.

प्रथम फेर ई-निविदा बाबतच्या सर्व अटी व शर्ती https://solapur.nic.in व https://mahatenders.gov.in वर उपलब्ध आहे. प्रथम फेर ई-निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि. 23 /03/2020 रोजी 5.00 वाजेपर्यंत आहे.

स्थळ:- सोलापूर
दिनांक:-07 /03/2020

सही/***
(संजीव जाधव)
अपर जिल्हाधिकारी, सोलापूर.